# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक १८.०५.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**गुन्हेशाखा, सोनसाखळी चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगिरी :— सोनसाखळी चोरीचे ०३ गुन्हे उघडकीस.**

दिनांक १०.१०.२०२५ चे १६.०० वा. ते १६.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी श्रीमती विमल प्रभाकर कोहळे, वय ६९ वर्षे, रा. प्लॉट. ०१, पावन भुमी, वर्धा रोड, नागपुर ह्या त्यांचे घरीच असलेल्या योगेश कॉर्नर विविध वस्तु भंडार दुकानात हजर असतांना, अज्ञात आरोपीने, फिर्यादीचे दुकानात सामान खरेदी करण्याचे बहाण्याने जावुन, फिर्यादी ह्या वस्तु देत असतांना, त्यांचे गळ्यातील १० ग्रॅम सोन्याची चैन किंमती ३०,०००/— रु. चा मुद्येमाल जबरीने हिसकावुन दुकानासमोर उभा असलेल्या साथीदाराचे पांढरे रंगाचे ॲक्टीवा गाडीने पळुन गेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सोनेगांव येथे आरोपीविरूध्द कलम ३०४, ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपींना निष्पन्न करून, सापळा रचुन आरोपी नामे १) विनय उर्फ विक्की राजबहादुर शाहु, वय २८ वर्षे, रा. ११३, बिनाकी, मंगळवारी, शाहु मोहल्ला, यशोधरानगर, नागपुर २) सचिन नत्थु शाहु, वय २६ वर्षे, रा. बाळाभाऊपेठ, पाचपावली, नागपुर यांना ताब्यात घेवुन, विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींना सखोल विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे सोनेगांव हद्दीत ईतर ०१ व पो. ठाणे बजाजनगर हद्दीत ०१ असे एकुण ०३ सोनसाखळी चोरी गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन गुन्ह्यात वापरलेली ॲक्टीवा गाडी क्र. एम.एच. ४९ सि.जि. ३३७५ किं. ८०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील तपासकामी सोनेगांव पोलीसांचे ताब्यात दिले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (अती. कार्य. गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उपआयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. रोशन पंडीत, सहा. पोलीस आयुक्त (अती.कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मसपोनि. मंगला हरडे, पोहवा. प्रफल्ल मानकर, मनिष बुरडे, संतोष गुप्ता, पोअं. कुणाल लांडगे, अनिकेत इंगळे व संदीप पडोळे यांनी केली.



## (गुन्हे)

**पोलीस ठाणे लकडगंज :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ११.०५.२०२६ चे २२.४५ वा. चे सुमारास, फिर्यादीचा भाऊ नामे वेदांत ईश्वर बुधे, वय २० वर्षे, रा. प्लॉट नं. २४३, कर्नलबाग मस्जीद जवळ, नवि शुक्रवारी, नागपुर हा त्याचा मित्र नामे चैतन्य रणधिर जाचक, वय २८ वर्षे, रा. प्लॉट नं. २०४, साईकृष्णा अपार्टमेंट, चौधरी हॉस्पीटल जवळ, सक्करदरा, नागपुर याचे सोबत त्याचे आर—१—५ दुचाकी क्र. एम.एच. ४९ सि.जि. ३१२१ वर मागे बसुन जात असता, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, जुना भंडारा रोड, नविन पुलावरून आर—१—५ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन मेहता पेट्रोल पंपावरील एका स्प्लेंडर मोटारसायकलला धडक दिल्याने दुचाकीवर मागे बसलेला फिर्यादीचा भाऊ गाडीवरून फेकल्या जावुन, गंभीर जखमी झाला. त्यास उपचाराकरीता रामदेवबाबा हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक १२.०५.२०२६ रोजी १२.३० वा. चे सुमारास डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी अर्पीत ईश्वर बुधे, वय २५ वर्षे, रा. प्लॉट नं. २४३, कर्नलबाग मस्जीद जवळ, नवि शुक्रवारी, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे लकडगंज येथे मपोउपनि. सोनल शिंदे ९८९२२६८६२४ यांनी दिनांक १८.०५.२०२६ रोजी आरोपी वाहन चालक चैतन्य रणधिर जाचक याचेविरूध्द कलम १०६(१), २८१ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**१) पोलीस ठाणे पाचपावली :—** दिनांक १७.०५.२०२६ चे १५.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, राय आशियाना अपार्टमेंट चे कॉर्नरवर, रेल्वे पुलाजवळील नाल्याजवळ एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे, रंग निमगोरा बांधा सडपातळ, चेहरा लांबट, उंची ५ फुट ५ इंच, डोक्याचे केस काळे पांढरे, दाढी बारीक, मिशी पांढरी, अंगात मोरपंखी रंगाचा पॅन्ट व त्याचे आंत लाल रंगाची अंडरवियर घातलेल्या वर्णनाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे पाचपावली येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी शेख तालीम शेख अस्लम, वय २४ वर्षे, रा. पाचपावली, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे मपोउपनि. नुतन जाधव यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कोतवाली :—** दिनांक १८.०५.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कोतवाली हद्दीत, प्लॉट नं. २९, तिळक रोड, गांधी गेट, महाल, नागपुर येथे राहणारे घरमालक सागर अरूण जोगी, वय ४२ वर्षे यांचे घराचे पेंटींग कामाकरीता आलेला पेंटर नामे देवेंद्र धनिराम चौधरी, वय २९ वर्षे, रा. मानेवाडा जुनी वस्ती, मयुर घाटे चे घरी किरायाने, नागपुर हा जिन्याचे मधोमध लोखंडी घोडी उभी करून, पेंटींग करण्यासाठी घोडीवर चढले असता, अचानक त्यांचा तोल जावुन, ते जमिनीवर खाली पडल्याने गंभीर जखमी झाले. त्यांचे सोबत काम करणारे यांनी त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन त्यांना मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी योगेश फगुलाल चंद्रेकर, वय २८ वर्षे, रा. महालक्ष्मी नगर, गल्ली नं. २, अजनी, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे कोतवाली येथे मपोउपनि. शितल जासुद यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** कु. साक्षी कुंवरलाल बघेल, वय १९ वर्षे, रा. घुनाडी, चांगुटोला, बालाघाट मध्य प्रदेश, हमु.— प्लॉट नं. १२०, सन्मार्ग नगर, शेख चे घरी किरायाने, नागपूर ही दिनांक १३.०५.२०२६ चे १२.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतुन, राहते घरी जॉब करीता जाते असे सांगुन कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ४ फुट ८ इंच, डोळे— घारे, केस— काळे लांब, अंगात— पांढऱ्या रंगाचा शॉर्ट शर्ट व काळ्या रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**२) पोलीस ठाणे शांतीनगर :—** कु. प्रगती श्रावण मोहाडीकर, वय १९ वर्षे, रा. लालगंज, राऊत चौक, मेहंदीबाग रोड, नागपूर ही दिनांक १२.०५.२०२६ चे २०.१५ वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतुन, राहते कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, डोळे— काळे, केस— काळे लांब, अंगात— गुलाबी रंगाचा शर्ट व मेहंदी रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**३) पोलीस ठाणे गिट्टीखदान :—** शिवशंकर लालाराम राऊत, वय ३३ वर्षे, रा. वायुसेना नगर, लहान गेट जवळ, हजारीपहाड, नागपूर हे दिनांक ०२.०५.२०२६ चे २२.०० वा. पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट ६ इंच, केस— काळे, अंगात— आकाशी रंगाचा शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— डाव्या हातावर शिव असे गोंदलेले आहे.

**४) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** पुरूषोत्तम गोविंदराव आसोलकर, वय ४१ वर्षे, रा. प्लॉट नं. १५, गौतम नगर, प्रिन्सेस लॉन जवळ, नरसाळा, नागपूर हे दिनांक ०५.०५.२०२६ चे ०७.०० वा. पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट ५ इंच, केस— विरळ व काळे पांढरे, भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



कु. साक्षी



कु. प्रगती



शिवशंकर



पुरूषोत्तम

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०१, नागपुर. | ३०३९६७/ २००६ | कलम ३२४, ३२५, ३४ भा.दं.वि. | अब्दुल बाबरमियॉ पठान, रा. मिठानिम दर्गाह समोर, सिव्हील लाईन, नागपुर | २०.०५.२०२६ |

स्वा/—

( अंकुश राठोड )

पोलीस उपनिरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.